स्क्रीन रिडरचा बादशहा

सांज दैनिक बीड

RNI : Regd.No.MAH/MAR/2010/43846

# वास्तव

भारतरत्न रतनजी टाटा यांच्या महान देशभक्तीला समर्पित

वर्ष २१

एडिटर इन चिफ- जितेंद्र सिरसाट

सच करीब से ही दिखता है...!

• बीड • शुक्रवार, दिनांक २७ मार्च २०२६ • वर्ष २१ वे • अंक : ५५ • पाने : ४ http ://epaper.beedvastav.com Email : beedvatsav@gmail.com • किंमत ३ रुपये

# महिला अशोक खरातकडे गेल्या तेव्हा त्यांची बुद्धी कुठे गेली होती? त्यांना स्वत :ची मर्यादा ठाऊक नव्हती का? त्या एवढ्या मूर्ख होत्या का?

भोंदू अशोक खरातच्या कारनाम्यांमुळे अवघ्या महाराष्ट्राचे राजकारण तापले असून भोंदू खरातचे अनेक नेते व अधिकाऱ्यांशी साटेलोटे आढळले!!

एखाद्या व्यक्तीने त्यांना आपल्या बेडरूममध्ये बोलावले, तर त्या तिथे सरळ चालत जातील का? त्यामुळे या प्रकरणी त्या ही दोषीच!!

त्या महिलांना स्वत :ची मर्यादा माहिती नव्हती का? तो मर्यादा ओलांडत होता तर त्याला लाथ घालून बाहेर पडण्याची, त्याला फटके देण्याची गरज होती!!

## अभिनेत्री ममता कुलकर्णी यांच्या विधानाने राज्यात तीव्र पडसाद उमटण्याची चिन्हे

मुंबई : प्रतिनिधी
भोंदू अशोक खरातने 50 हून अधिक महिलांचे लैंगिक शोषण केल्यामुळे अवघ्या महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली आहे. पण आता अभिनेत्री ममता कुलकर्णीने या पीडित महिलांनाच आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले आहे. या महिला अशोक खरातकडे गेल्या, तेव्हा त्यांची बुद्धी कुठे गेली होती? त्यांना स्वत :ची मर्यादा ठावूक नव्हती का? असा खडा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. त्यांच्या या विधानाचे तीव्र पडसाद उमटण्याची चिन्हे आहेत.



### खरात त्यांना स्पर्श करत असताना नक्की काय घडत आहे हे लक्षातच आले नाही का?

● भोंदू अशोक खरातच्या कारनाम्यांमुळे अवघ्या महाराष्ट्राचे राजकारण तापले आहे. भोंदू खरातचे अनेक नेते व अधिकाऱ्यांशी साटेलोटे आढळले आहे. या प्रकरणी राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रुपाली चाकणकर यांना आपल्या पदाचा राजीनामाही द्यावा लागला आहे. या पार्श्वभूमीवर अभिनेत्री ममता कुलकर्णी यांनी प्रस्तुत प्रकरणात भोंदू खरातकडे जाणाऱ्या महिलांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. या महिला अशोक खरातकडे गेल्या तेव्हा त्यांची बुद्धी कुठे गेली होती? या सर्व महिला एवढ्या मूर्ख होत्या का? की अशोक खरात त्यांना स्पर्श करत असताना नक्की काय घडत आहे हे त्यांच्या लक्षातच आले नाही?

### आजच्या काळात धर्माच्या नावाखाली प्रत्येकानेच ढोंगाचा आधार घेतला!!

● एखाद्या व्यक्तीने त्यांना आपल्या बेडरूममध्ये बोलावले, तर त्या तिथे सरळ चालत जातील का? त्यामुळे या प्रकरणी त्यांचाही दोष आहे. आजच्या काळात धर्माच्या नावाखाली प्रत्येकानेच ढोंगाचा आधार घेतला आहे. मी स्वत : माझ्या शरीराला अत्यंत कठोर शारीरिक कष्टांच्या अग्निदिव्यातून तावून सुलाखून काढून तपश्चर्या केली. पण आजकाल प्रत्येकजण धर्माच्या नावाखाली लोकांची लूट करत आहे. या तथाकथित धर्मगुरूंच्या भरवशावर राहणे थांबवा व तुमची भक्ती थेट ईश्वरावरच केंद्रित करा, असे ममता कुलकर्णी यांनी एका टीव्ही वाहिनीशी बोलताना म्हटले आहे.

● त्या पुढे म्हणाल्या, अशोक खरातला आपण अवतार असल्याचा भ्रम झाला आहे. त्याने त्या निर्दोष बायकांना फसवले. अशा महिलांच्या पतीने आपल्या पत्नीला समजून घेतले पाहिजे. हे नालायक लोक आहेत. तुम्ही त्या महिलांनाही विचारा. काय माहिती त्यांचाही त्यात सहभाग असू शकतो. मी तर त्या महिलांना दोषी मानत नाही. त्या निर्दोष आहेत. त्यांना क्षमा असावी, पण त्या खरातकडे ज्योतिषासाठी गेल्या होत्या की, अन्य काही करण्यासाठी गेल्या होत्या? त्यांना स्वत :ची मर्यादा माहिती नव्हती का? तो मर्यादा ओलांडत होता तर त्यांनी त्याला लाथ घालून बाहेर पडण्याची गरज होती. त्याला फटके देण्याची गरज होती. हे तुम्ही काय करत आहात असा जाब विचारण्याची गरज होती, असे त्या म्हणाल्या.

**महिलांना स्वत :ची मर्यादा माहिती नव्हती का?**

### भोंदू अशोक खरात याला 29 मार्चपर्यंत पोलिस कोठडीत

● दुसरीकडे, नाशिक सत्र न्यायालयाने भोंदू अशोक खरातला 29 मार्चपर्यंत पोलिस कोठडीत पाठवले आहे. खरात हा महिलांना एक विशिष्ट पाणी प्यायला द्यायचा. त्यानंतर तो आपण सिद्ध पुरुष असल्याचे सांगत त्यांच्यावर अत्याचार करायचा. त्याने 5 नरबळी दिल्याचाही संशय व्यक्त केला जात आहे. कारण, त्याच्या फार्महाऊसवर गोळीबार करण्यात आलेल्या काडतुसाच्या रिकाम्या पुंगळ्या आढळल्या आहेत. त्याने ही काडतुसे कुठे वापरलीत याचा तपास पोलिस करत आहेत.



## डंपर व चारचाकीची धडक, चारचाकी जळून खाक, २ जणांचा होरपळून मृत्यू

### आष्टी तालुक्यातील कापसी फाट्यावर भीषण अपघात

आष्टी / प्रतिनिधी :
तालुक्यातील कापसी फाटा येथे हायवा ( डंपर ) आणि चारचाकी वाहनामध्ये झालेल्या भीषण अपघातात चारचाकी गाडी पेटली आणि जळून खाक झाली. या दुर्घटनेत ऋषिकेश श्री हरी पुरी रा साळेगाव ता केज अशी प्राथमिक माहिती आहे असे ड्रायव्हर सीटवर बसलेल्या व्यक्तीचे नाव आहे सोबत एक महिला असे प्रवासी होते.



या चारचाकीतील प्रवासी जळून खाक झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, हे सर्व प्रवासी केज येथील असल्याचे सांगण्यात येत आहे.

अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. रुग्णवाहिका, पोलीस व अग्निशामक गाडी घटनास्थळी दाखल झाले आहेत. ग्रामस्थ व प्रवाशांनी त्यांना अपघातातून वाचविण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले मात्र त्यांना वाचविण्यत यश आले नाही.

आष्टी तालुक्यातील कापसी फाटा येथे झालेल्या भीषण अपघातात आष्टी पंचायत समिती अंतर्गत बीड – सांगवी ग्रामपंचायत येथे कार्यरत असलेले ग्राम विस्तार अधिकारी ह. भ. प. श्रीहरी महाराज पुरी यांची पत्नी पुष्पा श्रीहरी पुरी व मुलगा ऋषिकेश श्रीहरी पुरी ( २५ वर्षांपासून आष्टी येथे स्थायिक, मुळगाव केज ) यांचे जागीच निधन झाले.











### डॉ. गणेश ढवळे यांचा संताप

### शेतकऱ्यांना न्याय मिळणार का?

## मुख्यमंत्री साहेब, शेतरस्ता अडवल्यानंतर फार्मर आयडी, आधार कार्ड ब्लॉक... खरंच कारवाई होणार का?

बीड : प्रतिनिधी
देवेंद्र फडणवीस यांनी शेतकरी व शेतीमालाच्या वाहतुकीसाठी 'मुख्यमंत्री बळीराजा पाणंद/ शेत रस्ते योजना' प्रभावी करण्यासाठी सुधारित शासन आदेश जारी केला आहे. या आदेशानुसार, शेतरस्ता अडविणाऱ्या व्यक्तीवर कठोर कारवाई करण्यात येणार असून त्याचा शासकीय योजनांवरील लाभ बंद केला जाणार आहे. तसेच फार्मर आयडी आणि आधार कार्ड ब्लॉक करण्याची तरतूद करण्यात आली आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांना दंडासह पुढील पाच वर्षे सर्व शासकीय योजनांपासून वंचित ठेवण्याचाही इशारा देण्यात आला आहे.

मात्र, ग्रामीण भागात प्रत्यक्ष परिस्थिती वेगळीच दिसून येत आहे. शेतरस्त्यांच्या वादातून भांडणे, तणाव आणि पोलिसांत गुन्हे दाखल होण्याच्या घटनांमध्ये वाढ होत आहे. अनेक शेतकऱ्यांनी वारंवार लेखी तक्रारी करूनही त्यांना वेळेत न्याय मिळत नसल्याच्या घटना समोर येत आहेत. त्यामुळे शासनाचा हा कठोर आदेश प्रत्यक्षात प्रभावीपणे अंमलात येणार की नेहमीप्रमाणे कागदोपत्रीच राहणार, असा सवाल सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे ( लिंबागणेशकर ) यांनी उपस्थित केला आहे.





**तक्रार करूनही रस्ता मोकळा नाही – शिवचरण नाईगडे यांची खंत**

बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील गट क्रमांक ३८५ व ३८६ मध्ये शेतजमीन असलेल्या शिवचरण महादेव नाईगडे यांच्या शेताकडे जाणारा सुमारे ३५ वर्षांपासूनचा शेतरस्ता महिनाभरापूर्वी शेजाऱ्यांनी खोदून व बांध भरून अडवला आहे. दि. ११ मार्च रोजी लिंबागणेश येथे छत्रपती शिवाजी महाराज राजस्व समाधान शिबिरात त्यांनी चंद्रकांत शेळके यांना लेखी निवेदनाद्वारे रस्ता मोकळा करून देण्याची मागणी केली होती. त्यावेळी आश्वासन मिळाले, मात्र अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. दरम्यान, तहसीलदारांना भेटण्यासाठी बीडकडे जात असताना त्यांच्या आईचा अपघात झाला होता. तरीही न्यायासाठी आज पुन्हा आईला बीडला जावे लागत असल्याची खंत शिवचरण नाईगडे यांनी व्यक्त केली आहे. एकीकडे शासन कडक निर्णय जाहीर करत असताना दुसरीकडे प्रत्यक्ष अंमलबजावणी होत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरत आहे.

सांज दैनिक बीड
२० वर्ष
वास्तव





## मेष रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस गोंधळात टाकणारा असेल. तुम्हाला विनाकारण खूप धावपळ करावी लागेल, ज्यामुळे तुमचे मन अस्वस्थ होईल. काही काम पूर्ण न झाल्यामुळे तुम्ही निराश व्हाल, परंतु तुम्हाला तुमच्या बोलण्यात आणि वागण्यात संयम ठेवावा लागेल, अन्यथा समस्या उद्भवू शकते. जर तुमच्या मालमत्तेशी संबंधित कोणताही खटला न्यायालयात सुरू असेल तर आजचा या प्रकरणात तुमच्या बाजूने निकाल लागेल. तुम्ही तुमच्या विरोधकांवर विजय मिळवाल. राजकारणात काम करणाऱ्या लोकांना मोठे पद आणि आदर मिळू शकतो. जर कुटुंबात परस्पर मतभेद असतील तर ते सोडवले जाऊ शकतात.

## वृषभ रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस आरोग्याच्या दृष्टीने कमकुवत राहणार आहे, म्हणून तुम्हाला तुमच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करणे टाळावे लागेल. तुम्ही नवीन व्यवसाय सुरू करू शकता, परंतु आजचा भागीदारीच्या कामात अडचणी येण्याची शक्यता आहे, म्हणून आजचापासून भागीदारीचे काम सुरू करू नका. तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे. तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल. कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास आजचा यशस्वी होईल.

## मिथुन रास

➤ या राशीसाठी आजचा दिवस खूप शुभ राहणार आहे. तुम्हाला नवीन वाहन मिळू शकते. तुम्ही तुमच्या कुटुंबातील सदस्यांसह कोणत्याही शुभ समारंभात सहभागी होऊ शकता. मुलांशी तुमचा चांगला समन्वय असेल आणि तुम्ही त्यांच्या शिक्षणात त्यांना पाठिंबा द्याल. तुमच्यासाठी नवीन कामात गुंतवणूक करणे चांगले राहील. तुमच्या मनात असलेल्या समस्यांबद्दल तुम्ही वरिष्ठ सदस्यांशी बोलू शकता आणि त्यांच्याकडून तुम्हाला योग्य उपाय मिळतील. आईचा कोणताही जुना आजार पुन्हा उद्भवू शकतो ज्यामुळे त्रास होईल. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे.

## कर्क रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस कायदेशीर बाबींमध्ये चांगला राहणार आहे. तुम्हाला उत्पन्नाचे नवीन स्रोत मिळतील. कुटुंबातील लोक तुमच्या शब्दांचा आदर करतील, ज्यामुळे तुम्ही समाधानी राहाल आणि काहीतरी खास करण्याची इच्छा प्रबळ राहील. आजचा तुम्ही तुमच्या कुटुंबाच्या आनंदासाठी काही भौतिक वस्तू खरेदी करू शकता. कोणत्याही अनोळखी व्यक्तीच्या प्रभावात येऊ नका, अन्यथा तो तुम्हाला फसवू शकतो. तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल. कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास आजचा यशस्वी होईल.

## सिंह रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस अचानक लाभदायक असेल. पण आजचा गाडी चालवताना त्यांना काळजी घ्यावी लागेल कारण दुखापत आणि अपघात होण्याची शक्यता आहे. व्यवसायात कोणासोबतही भागीदारीत कोणताही करार करू नका, अन्यथा तुमची फसवणूक होऊ शकते, असा सल्ला दिला जातो. तुम्हाला एखाद्या गोष्टीची काळजी असेल. आजचा तुम्हाला तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल, अन्यथा तुमचा प्रियकर एखाद्या गोष्टीने नाराज होऊ शकतो. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

## कन्या रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस तुमच्यासाठी थोडा गोंधळात टाकणारा असेल. मानसिक अस्वस्थतेमुळे तुम्हाला निर्णय घेण्यात अडचण येईल. परस्पर भांडणांमुळे कुटुंबातील वातावरण बिघडू शकते. तुमच्या मनात एखाद्या गोष्टीची भीती असेल, ज्यामुळे तुम्ही चिंतेत राहाल. आजचा एखाद्या स्पर्धेत यश मिळाल्याने विद्यार्थ्यांना आनंद होईल. नोकरी करणाऱ्या लोकांवर कामाचा ताण जास्त असेल, परंतु तरीही वरिष्ठांच्या मदतीने ते वेळेवर काम पूर्ण करतील. वैवाहिक जीवन तुमच्या जोडीदाराची तब्येत ठीक नसेल तर आजचा ती सुधारेल.

## तूळ रास

➤ आजचा, तूळ राशीसाठी फायदेशीर राहील आणि आदर वाढेल. तुम्हाला वाहनाचे सुख मिळेल, जे लोक वाहन खरेदी करण्याचा विचार करत आहेत त्यांच्यासाठी आजचा दिवस या बाबतीत अनुकूल असेल. कुटुंबातील एखाद्या सदस्याला तुम्ही बोललेल्या गोष्टीबद्दल वाईट वाटू शकते, ज्यामुळे तो रागावू शकतो. तुमच्या अभ्यासाशी संबंधित काही प्रकरणे सोडवली जात आहेत असे दिसते. खूप दिवसांनी जुना मित्र भेटून तुम्हाला आनंद होईल. कुटुंबातील सदस्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळू शकेल. एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो.

## वृश्चिक रास

➤ आजचा तुमच्यासाठी प्रगतीचा मार्ग मोकळा करेल. व्यवसायात नफा मिळाल्यानंतर तुम्ही आनंदी व्हाल. एखाद्याकडून ऐकलेल्या गोष्टीवरून वाद घालू नका, अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते. पैशाशी संबंधित कोणताही विषय तुम्हाला त्रास देऊ शकतो. आर्थिक बाबींमध्ये तुम्ही मित्रांकडून सल्ला घेऊ शकता परंतु इतर कोणाच्याही प्रभावाखाली कोणताही निर्णय घेऊ नका अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते. विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाचा मार्ग मोकळा होईल. विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या समस्यांबद्दल त्यांच्या शिक्षकांशी बोलावे लागू शकते. ज्येष्ठांचे मार्गदर्शन तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल.

## धनु रास

➤ आजचा दिवस तुमच्यासाठी सामान्य असेल. तुम्हाला तुमच्या विरोधकांपासून सावध राहावे लागेल. अनावश्यक अडचणीत पडणे टाळावे आणि स्वत:च्या कामात लक्ष द्यावे. जर तुम्ही दुसऱ्यांच्या बाबतीत ढवळाढवळ केली तर तुम्ही अडचणीत येऊ शकता. जर तुमच्या तब्येतीत काही बिघाड झाला असेल तर आजचा ती सुधारेल. कुटुंबातील सदस्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळू शकेल. एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो. खूप दिवसांनी जुना मित्र भेटून तुम्हाला आनंद होईल. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

## मकर रास

➤ या दिवस तुमच्यासाठी गोंधळात टाकणारा असू शकतो. तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल. कुटुंबातील एखाद्या सदस्याकडून तुम्हाला काही चांगली बातमी ऐकायला मिळू शकते. आजचा तुम्ही तुमच्या कामाच्या व्यवसायात काही बदल कराल परंतु आजचा कोणतेही धोकादायक पाऊल उचलू नका. आजचा तुम्हाला तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल, अन्यथा तुमचा प्रियकर एखाद्या गोष्टीने नाराज होऊ शकतो. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

## कुंभ रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस चांगला राहणार आहे. व्यवसायात, तुम्हाला मागील योजनांमधून चांगले फायदे मिळू शकतात, ज्यामुळे तुम्हाला आनंद होईल. जर तुमचे कोणतेही प्रलंबित काम तुम्हाला बऱ्याच काळापासून त्रास देत असेल तर तेही पूर्ण होऊ शकते. जर तुम्हाला कोणत्याही शारीरिक समस्येमुळे त्रास झाला असेल तर तुम्हाला त्यातही आराम मिळत असल्याचे दिसून येते. विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या समस्यांबद्दल त्यांच्या शिक्षकांशी बोलावे लागू शकते. ज्येष्ठांचे मार्गदर्शन तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल. पैशाशी संबंधित कोणताही विषय तुम्हाला त्रास देऊ शकतो.

## मीन रास

या राशीसाठी आजचा दिवस चैनीच्या वस्तूंमध्ये वाढ आणणारा आहे. तुम्ही तुमच्या आयुष्यात एक मोठा निर्णय घेऊ शकता आणि वरिष्ठ सदस्य तुमच्या बोलण्याने खूश होतील. तुमच्या जोडीदाराकडून तुम्हाला भेटवस्तू मिळू शकते. तुमच्या पालकांच्या आशीर्वादाने तुम्ही आजचा यशाकडे वाटचाल कराल. आजचा व्यवसायात तुमची कमाई चांगली असेल. नोकरी करणाऱ्या लोकांवर कामाचा ताण जास्त असेल, परंतु तरीही वरिष्ठांच्या मदतीने ते वेळेवर काम पूर्ण करतील. वैवाहिक जीवन तुमच्या जोडीदाराची तब्येत ठीक नसेल तर आजचा ती सुधारेल. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते.

# सम्राट अशोक : तलवारीतून धम्माकडे- मानवतेच्या इतिहासातील अद्वितीय प्रवास

**भारतीय इतिहासात अनेक राजे झाले. काहींनी साम्राज्ये उभी केली, काहींनी युद्धे जिंकली, तर काहींनी संपत्ती आणि वैभवाची शिखरे गाठली. परंतु इतिहासात असे फार थोडे राजे आहेत ज्यांनी युद्ध जिंकूनही युद्धाचा त्याग केला आणि सत्ता असूनही मानवतेचा मार्ग स्वीकारला. अशाच अद्वितीय व्यक्तिमत्तवाचे नाव म्हणजे अशोका, ज्यांना इतिहासात सम्राट अशोक महान म्हणून ओळखले जाते. सम्राट अशोक हे केवळ एक सामर्थ्यशाली राजा नव्हते, तर ते मानवतेचा संदेश देणारे, दयाभाव आणि करुणेचा मार्ग दाखवणारे एक अद्वितीय शासक होते. त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या जीवनाचा, त्यांच्या विचारांचा आणि त्यांच्या धम्मनीतीचा विचार करताना भारतीय समाजाला आजही नवी दिशा मिळू शकते.**




विशेष

प्रवीण बागडे
नागपूर मो.क्र. ९९२३६२०९१९


अशोक हे बिंदुसार यांचे पुत्र आणि महान सम्राट चन्द्रगुप्त मौर्य यांचे नातू होते. मौर्य साम्राज्य आधीच विशाल होते, परंतु अशोक यांच्या काळात त्याने प्रचंड विस्तार केला. त्यांच्या सामर्थ्यवान लष्कराने भारतातील मोठा भूभाग जिंकला. त्यांच्या राजवटीच्या सुरुवातीला ते एक कठोर, निर्णायक आणि पराक्रमी योद्धा म्हणून ओळखले जात होते. सत्ता मजबूत करण्यासाठी त्यांनी अनेक युद्धे लढली. परंतु त्यांच्या आयुष्यातील सर्वात मोठा टप्पा ठरला तो कालिंग युद्ध कलिंग, इतिहास बदलणारा क्षण. कलिंग (आजचे ओडिशा) जिंकण्यासाठी झालेल्या युद्धाने इतिहासाची दिशा बदलली. या युद्धात लाखो लोक मारले गेले, हजारो जखमी झाले आणि असंख्य कुटुंबे उद्ध्वस्त झाली. रणांगणावर पडलेली प्रेते, विधवा झालेल्या स्त्रिया, अनाथ झालेली मुले या सगळ्या दृश्यांनी सम्राट अशोक यांचे मन हादरून गेले. इतिहासात सांगितले जाते की या युद्धानंतर त्यांनी रणांगणावर उभे राहून एक प्रश्न स्वत:ला विचारला, "या विजयाची किंमत इतकी भयानक का असावी?" याच क्षणापासून त्यांच्या आयुष्यातील सर्वात मोठा परिवर्तनाचा प्रवास सुरू झाला.

कलिंग युद्धानंतर अशोक यांनी हिंसेचा मार्ग सोडला आणि बुद्धिस्म स्वीकारले. त्यांनी धम्म हा जीवनाचा आणि राज्यकारभाराचा आधार बनवला. धम्म म्हणजे केवळ धार्मिक विचार नव्हता. तर तो होता दया, करुणा, अहिंसा, सहिष्णुता, सर्व धर्मांचा आदर. सम्राट अशोक यांनी युद्ध जिंकणाऱ्या राजापासून मानवतेचा संदेश देणाऱ्या राजामध्ये केलेले रूपांतर हे जगाच्या इतिहासात अद्वितीय मानले जाते. अशोक यांनी आपल्या राज्यात धम्मनीती राबवली. त्यांनी प्रजेसाठी अनेक कल्याणकारी योजना सुरू केल्या. रस्त्यांच्या कडेला झाडे लावणे, प्रवाशांसाठी धर्मशाळा उभारणे, विहिरी बांधणे, रुग्णालये उभारणे या सगळ्या गोष्टी त्या काळात अत्यंत प्रगत विचारांचे उदाहरण होते. त्यांनी प्राण्यांच्या हत्येवर मर्यादा आणल्या आणि पर्यावरणाबद्दल संवेदनशीलता दाखवली. त्यांच्या शिलालेखांमध्ये प्रजेबद्दलची काळजी आणि नैतिकतेचा संदेश स्पष्टपणे दिसतो.

सम्राट अशोक यांनी बुद्धिसम चा संदेश केवळ भारतापुरता मर्यादित ठेवला नाही. तर त्यांनी धम्मदूत विविध देशांत पाठवले. श्रीलंका, म्यानमार, थायलंड, नेपाळ, अफगाणिस्तान अशा अनेक देशांमध्ये बौद्ध विचारांचा प्रसार झाला. इतिहासात सांगितले जाते की त्यांचा पुत्र महिंदा आणि कन्या संघमित्ता यांनी श्रीलंकेत बौद्ध धर्माचा प्रसार केला. यामुळे भारताची सांस्कृतिक ओळख जगभर पोहोचली. अशोक यांनी आपल्या प्रशासनात नैतिकतेला विशेष महत्त्व दिले. त्यांनी धम्ममहामात्र नावाचे अधिकारी नेमले जे लोकांच्या कल्याणाची काळजी घेत होते. राज्यकारभाराचा उद्देश केवळ सत्ता टिकवणे नसून प्रजेचे सुख आणि कल्याण आहे, हा विचार त्यांनी प्रत्यक्षात आणला. आजच्या लोकशाही व्यवस्थेतही हा विचार अत्यंत महत्त्वाचा आहे.

आज भारताने विज्ञान, तंत्रज्ञान आणि अर्थकारणात मोठी प्रगती केली आहे. परंतु सामाजिक तणाव, हिंसा, असहिष्णुता आणि द्वेषाची भावना अनेक ठिकाणी दिसून येते. अशा वेळी सम्राट अशोक यांची धम्मनीती आपल्याला आठवण करून देते की, सत्ता मोठी असते, पण मानवता त्याहून मोठी असते. त्यांच्या जीवनातून आपल्याला एक महत्त्वाचा संदेश मिळतो. खरा विजय तलवारीने नाही, तर करुणेने मिळतो. आज भारताच्या राष्ट्रीय प्रतीकांमध्येही अशोक यांची छाप दिसते. भारतीय राष्ट्रचिन्हातील लॉयन कैपिटल ऑफ अशोका हे त्यांच्याच काळातील सारनाथ स्तंभाचे शिल्प आहे. तसेच भारतीय ध्वजावरील अशोक चक्र हे त्यांच्या धम्मचक्राचे प्रतीक आहे. याचा अर्थ असा की आधुनिक भारताच्या मूल्यांमध्येही सम्राट अशोक यांच्या विचारांची छाया आहे. आज जगभरात युद्धे, संघर्ष आणि राजकीय तणाव वाढताना दिसत आहेत. अशा काळात सम्राट अशोक यांचा इतिहास आपल्याला एक महत्त्वाचा धडा देतो. हिंसेने सत्ता मिळू शकते, पण मन जिंकता येत नाही. मानवतेचा मार्ग स्वीकारणारा राजा खऱ्या अर्थाने महान ठरतो.

सम्राट अशोका यांचे जीवन म्हणजे शक्तीपासून शांतीकडे, युद्धापासून करुणेकडे आणि अहंकारापासून मानवतेकडे जाणाऱ्या प्रवासाची प्रेरणादायी कथा आहे. त्यांनी दाखवलेला धम्माचा मार्ग आजही मानवतेसाठी प्रकाशाचा दीप आहे. आज त्यांच्या जयंतीनिमित्त आपण केवळ त्यांच्या साम्राज्याचे स्मरण करू नये, तर त्यांच्या विचारांचे स्मरण करावे. कारण खऱ्या अर्थाने महान राजा तोच असतो, जो तलवारीने नव्हे, तर मानवतेने जग जिंकतो. सम्राट अशोक यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या महान विचारांना विनम्र अभिवादन!

# महिलांना नसतो हृदयविकाराचा धोका? कारण जाणून घ्या! काय आहेत कारणे?

**हृदयविकाराचा झटका हा आजच्या काळातील सर्वात धोकादायक आणि सामान्य आजारांपैकी आहे. जेव्हा हृदयाकडे होणारा रक्तप्रवाह थांबतो. तेव्हा हृदयविकाराचा झटका येतो. शरीरातील कोलेस्ट्रॉलचं प्रमाण वाढल्यानं हृदयविकाराची समस्या उद्भवते.**



## हृदयविकाराच्या झटक्याचं नेमकं कारण काय?

वाढतं कोलेस्ट्रॉल, मधुमेह, उच्च रक्तदाब, लठ्ठपणा, अनुवांशिक घटक, तंबाखू आणि मद्यपान, अतिरिक्त ताण आणि हृदयाचे जुनाट आजार यांसारख्या गोष्टींकडे दुर्लक्ष केल्यास हृदयविकाराच्या झटक्याचा धोका वाढतो.

## महिलांपेक्षा पुरुषांना हृदयविकाराचा धोका जास्त

हृदयविकाराचा झटका हा आजार सामान्य झाला असला तरी पुरुष आणि स्त्रियांमध्ये हृदयविकाराचा झटका येण्याच्या प्रमाणात मोठा फरक आढळतो. हा आजार पुरुष आणि स्त्रियांसाठीही धोकादायक आहे, परंतु आकडेवारीनुसार पुरुषांना हृदयविकाराचा जास्त धोका असतो. पुरुषांमध्ये पहिल्या हृदयविकाराच्या झटक्याचे सरासरी वय सुमारे ६५ वर्षे असते, तर स्त्रियांमध्ये ते सुमारे ७२ वर्षे असते. याचा अर्थ असा की, स्त्रियांमध्ये हा धोका पुरुषांपेक्षा अंदाजे १० वर्षांनी उशिरा वाढतो.

तज्ज्ञांच्या मते, महिलांना हृदयविकाराचा झटका येण्याचा धोका कमी असतो, ज्याचं मुख्य कारण इस्ट्रोजेन हे असू शकते. जरी हे पूर्णपणे सिद्ध झाले नसले तरी, असे मानले जाते की यामुळे हृदयाच्या आरोग्याचे रक्षण होण्यास मदत होते. तर दुसरीकडे, पुरुष जास्त प्रमाणात तंबाखू आणि मद्यपान करतात, जे हृदयविकाराचे प्रमुख कारण आहेत., पुरुषांमध्ये तणाव व्यवस्थापनाची क्षमता महिलांपेक्षा कमी असते असे मानले जाते. सततचा ताण आणि मानसिक दबावाचा हृदयावर नकारात्मक परिणाम होतो, ज्यामुळे हृदयविकाराच्या झटक्याचा धोका वाढण्याची शक्यता असते.

## अशी घ्या काळजी

हे समजून घेणं महत्त्वाचं फार महत्वाचं आहे की, योग्य ती काळजी घेतल्यास हृदयविकाराचा झटका पूर्णपणे टाळता येतो. त्यामुळे नियमित आरोग्य तपासणी करणं आणि रक्तातील साखर, कोलेस्ट्रॉल व रक्तदाब नियंत्रणात ठेवणं अत्यंत महत्त्वाचं आहे. याबरोबरच फळ, पालेभाज्या, मीठ आणि साखर कमी असलेला आरोग्यदायी आहार घेणं आपल्या हृदयासाठी फायदेशीर ठरते.

## काय आहेत कारणे?

भारतात आरोग्याच्या समस्या वाढत आहेत. भारतात हृदयविकाराचा धोका वाढला आहे. कोरोनानंतर अनेक जणांना हृदयविकाराची समस्या जाणवत आहे. इतर आजार असलेल्या लोकांमध्ये हृदयविकाराचा धोका अधिक असते. हर्टअटॅक येण्याचं प्रमाण तरुणांमध्ये ही वाढले आहे. काय आहेत या मागची नेमकी कारणे जाणून घ्या. गेल्या एका वर्षात भारतात हृदयविकाराच्या घटनांनी भीतीचे वातावरण तयार केले आहे. भारतात तरुण वयातही लोकांना हृदयविकाराच्या झटक्यामुळे जीव गमवावा लागत आहे. अगदी वयाच्या 12 व्या वर्षीही मुलांना हृदयविकाराचा झटका आला आहे कोरोनानंतर हृदयविकारांमध्ये अचानक वाढ झाली आहे. यामुळे जगभरात चिंता वाढली आहे. हृदयरोग ही जागतिक समस्या बनली आहे. काही वर्षांपूर्वी तो फक्त वृद्ध व्यक्तींमध्ये दिसत होता. पण आता तरुण वयातही लोकांना जीव गमवावा लागला आहे.

कोरोनानंतर धोका वाढला

कोविड-19 नंतर जीवनशैलीवर वाईट परिणाम झाला आहे. असं तज्ज्ञांचं मत आहे. शारीरिक हालचालींचा अभाव, ताणतणाव, नैराश्य, खाण्याच्या चुकीच्या सवयी यामुळे हा आजार वाढत आहे. फक्त भारतातच नाही तर जगातील अनेक देशांमध्ये गेल्या काही वर्षांत हृदयविकाराच्या अधिक रुग्णांची नोंद झाली आहे. 2022 मध्ये हृदयविकाराच्या झटक्याने 32,457 लोकांचा मृत्यू झाला आहे.

# जाणून घ्या लसूण आणि मधाचे चमत्कारिक फायदे

## रोज सकाळी रिकाम्या पोटी सेवन करणे ठरते फायदेशीर

तुम्हाला माहित आहे का की रोजच्या जेवणाची चव वाढवणारा लसूण खाल्याने अनेक चमत्कारिक फायदे होतात. लसनाप्रमाणे मधाचे सेवन देखील शरीरासाठी फायदेशीर ठरते.

आयुर्वेदानुसार, जर तुम्ही वाढत्या कोलेस्ट्रॉलनं त्रस्त असाल तर लसणाच्या कच्च्या पाकळ्याचं सेवन करणं फायदेशीर मानलं जातं. लसणात 'एलिसिन' नावाचं गुणकारी घटक असतं. हे एक प्रकारचं नैसर्गिक प्रतिजैविक आणि अँटीऑक्सिडंट असून याचं सेवन केल्यानं शरीरातील रक्तभिसरण सुधारण्यास मदत होते. तसेच, यामुळे रक्तही जाड होत नाही. लसणामध्ये असलेलं सल्फर आणि इतर रसायने लसणाला बॅक्टेरियाविरोधी आणि रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्याचे गुणधर्म प्रदान करतात.



तसेच, मध हा निसर्गाचा एक अनमोल ठेवा असून मधुमेह असलेल्या व्यक्तींवरही मधाचा फारसा परिणाम होत नाही. यामध्ये फ्लेव्होनॉइड्स आणि पॉलिफेनोल्स हे दोन महत्त्वाचे अँटीऑक्सिडंट्स असतात. यामुळे, शरीरातील खाज, लालसरपणा कमी होण्यास आणि रोगप्रतिकारक शक्ती मजबूत होण्यास मदत होते. मधामध्ये असलेले अँटीबॅक्टेरियल, अँटीव्हायरल आणि अँटीफंगल गुणधर्म विविध आजारांशी लढण्यासाठी अंत्यत उपयुक्त ठरतात.

लसूण आणि मध या दोन्ही मिश्रणांना आपल्या शरीरासाठी अमृत मानलं जातं. हे दोन्ही मिश्रण श्वसनाचे आजार, संसर्ग, त्वचा रोग, हृदयविकार आणि पोटासंबधित समस्यांवर अत्यंत प्रभावी ठरतात. यामुळे सर्दी, खोकला आणि तापाची लक्षणे कमी होण्यास मदत होते. तसेच, रक्त पातळ होऊन 'स्ट्रोक'चा धोका कमी होतो.

याबरोबरच उच्च रक्तदाब, संधिवात, दातदुखी आणि बद्धकोष्ठतेसाठीही हे अत्यंत गुणकारी मानलं जातं. त्यामुळे या दोन्ही मिश्रणाचं नियमितपणे सेवन करणं आपल्या शरीरासाठी अत्यंत गुणकारी मानले जाते.

## असे तयार करा लसूण आणि मधाचे चमत्कारिक मिश्रण :

एका स्वच्छ काचेच्या बरणीत ताज्या लसणाच्या पाकळ्या सोलून टाका. त्यात शुद्ध मध घालून बरणी पूर्ण भरा. ५ ते ७ दिवस हे मिश्रण तसेच राहू द्या (मिश्रण छान मुरू द्या) त्यानंतर दररोज सकाळी रिकाम्या पोटी याचे सेवन करा. टीप : लहान मुले आणि गर्भवती महिलांनी डॉक्टरांच्या सल्ल्यानंतरच याचे सेवन करावे.


सांज दैनिक बीड
वास्तव
सायं. दैनिक बीड वास्तव हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक जितेंद्र कान्होजीराव सिरसाट** शुभेच्छा प्रिंटिंग प्रेस एमआयडिसी. बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून बीड वास्तव ऑफिस बशीर गंज चौक, बीड ४३११२२ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. **संपादक - जितेंद्र कान्होजीराव सिरसाट, निवासी संपादक - अरविंद ओव्हाळ** (या अंकामध्ये छापलेल्या मजकूराशी मालक संपादक प्रकाशक सहमत असतीलच असे नाही) (वाद-विवाद बीड न्याय कक्षेत) मो. 9022952922

विशेष



# देवांश गायकवाडची सैनिकी विद्यालयात निवड

➤ कन्नड / प्रतिनिधी :
श्री संत ज्ञानेश्वर विद्या मंदिर, शिवनगर (कन्नड) येथील इयत्ता ५ वीचा विद्यार्थी चि. देवांश उमेश गायकवाड याने आपल्या जिद्द, चिकाटी आणि सातत्यपूर्ण अभ्यासाच्या जोरावर छत्रपती संभाजीनगर येथील प्रतिष्ठित सैनिकी विद्यालयात प्रवेश मिळवून शाळेचा तसेच गावाचा नावलौकिक उंचावला आहे. अत्यंत स्पर्धात्मक आणि कठीण प्रवेश प्रक्रियेत मिळवलेले हे यश परिसरासाठी अभिमानास्पद ठरले असून, गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

देवांश हा अभ्यासू, शिस्तप्रिय आणि मेहनती विद्यार्थी म्हणून ओळखला जातो. लहान वयातच देशसेवेची भावना मनात ठेवून त्याने सैनिकी शिक्षणाची दिशा निवडली आहे. त्याच्या या यशामागे त्याची स्वत:ची जिद्द, पालकांचे मार्गदर्शन तसेच शिक्षकांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे.

या उल्लेखनीय यशाबद्दल शाळेत देवांशचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला. मुख्याध्यापक श्री प्रकाश जिरेमाळी यांच्या हस्ते त्याचा सत्कार करण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी त्याच्या कर्तृत्वाचे कौतुक करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष साबुसिंग राठोड, उपाध्यक्ष रामदास सुरडकर, सचिव पांडुरंग राठोड, सहसचिव संजय पुरी, कोषाध्यक्षा सरला सोनवणे, संचालक शिवाजी वाघ, मुकुंद शिंदे तसेच शाळेचे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

देवांशच्या या यशामुळे इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळत असून, शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेचा प्रत्यय पुन्हा एकदा आला आहे. भविष्यातही असेच यश संपादन करून देवांश देशसेवेत मोठे योगदान देईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती अशोक नगर कार्यकारिणी जाहीर

● पान ४ वरून ... डीजे ला फाटा देत डीजे मुक्त करण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आला असून पारंपारिक वाद्याच्या स्वरूपात जयंती उत्सव मिरवणूक काढण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला.

या जयंती उत्सवानिमित्त सम्राट अशोक नगर येथे सामाजिक सांस्कृतिक व प्रबोधन पर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार असल्याचे नूतन कार्यकारिणीच्या पदाधिकाऱ्यांच्या वतीने सांगण्यात आले असून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रचार व प्रसार करण्याचा प्रेरणादायी संकल्प समितीच्या पदाधिकाऱ्यांकडून व्यक्त करण्यात आला. हा जयंती उत्सव शिस्तबद्ध पद्धतीने साजरा करण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे असे आवाहन समितीच्या वतीने करण्यात आले. या जयंती उत्सव समितीच्या कार्यकारणी चे उपस्थितांच्या वतीने अभिनंदन करून जयंती उत्सव यशस्वी करण्यासाठी काम करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. या बैठकीस सचिन जावळे, प्रशिक साळवे, प्रशांत अवचार, पवन राजे शेळके, केतन क्षीरसागर, महेंद्र भाग्यवंत, विशाल पायके, सुरेश नाना क्षिरसागर, करण बापू वावळकर, नितीन गायकवाड, धम्मपाल देशमाने, पियुष निर्मळ, सुरेश बनसोडे, गुड्डू साळवे, विराट चांदमारे, बुद्धीराज सिरसट, मिलिंद शिंदे, रतन राऊत, राजू मोगरेकर, आकाश भद्रे, सौरभ सिरसट, विवेक जाधव, संतोष क्षिरसागर, विजय वैराळे, प्रणव मोरे आदींची उपस्थिती होती.

# संत एकनाथ रुग्णालयात उपचार घेतांना निष्काळजीपणा झाल्याचे आरोप चुकीचे अन् बिनबुडाचे

## ➤ डॉ. पंडित किल्लारीकर

➤ पैठण : सर्जेराव खडसन
पैठण ते पाचोड मुख्य रस्त्यावरील संत एकनाथ सहकारी (मल्टीस्पेशालिटी) रुग्णालयाच्यानिष्काळजीपणामुळे शस्त्रक्रियेनंतर डोळ्यांची दृष्टी गेली असल्याचा एका रुग्णाच्या नातेवाईकांकडून विविध वर्तमानपत्राच्या माध्यमातून रुग्णालयावर आरोप करण्यात आला. त्यानंतर रुग्णालयातील डॉ. पंडित किल्लारीकर यांनी या प्रकरणी प्रसार माध्यमांशी संवाद साधत रुग्णालयाविषयी विविध वर्तमानपत्रातून जे वृत्त छापून आले आहे ते पूर्णत: चुकीचे आणि निराधार असल्याचे स्पष्ट केले.

या प्रकरणी माहिती अशी की, एक महिन्यापूर्वी विनोद भारद्वाज हे त्यांच्या पत्नी ममता यांचे पोटदुखी व गर्भाशय समस्याचे निदान करण्यासाठी रुग्णालयात उपचारासाठी घेऊन आले होते. येथील डॉक्टरांनी या महिलेच्याआवश्यक त्या तपासण्या करून शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला.

शस्त्रक्रियेनंतर पहिल्या दिवशी ती महिला ठिकठाक होती. परंतु दुसऱ्या दिवशी संध्याकाळी डॉक्टर तिला तपासायला गेले असता तीने “मला थोडं धुरकट दिसत आहे” असे सांगितले. त्यांनंतर पुन्हा रुग्णालयातील तज्ञ डॉक्टरांनी या महिलेची तपासणी करून गर्भाशयाची पिशवी काढली मग डोळ्याची दृष्टी जाण्याचे कारण काय ? याचे निदान करण्याच्या प्रयत्नात होते.



“माझ्या ३० ते ३५ वर्षाच्या वैद्यकीय अनुभवाच्या आधारे मी ठामपणे सांगू शकतो की गर्भाशयाच्या शस्त्रक्रियेनंतर दृष्टी जाणे असे होणे शक्य नाही. शेवटी खबरदारी म्हणून आम्ही परत या महिलेच्या इतर तपासण्या करून डोक्याचा सिटीस्कॅन केला असता तिच्या मेंदूला प्रॉब्लेम असल्याचे आढळून आले. त्यांनंतर आम्ही तात्काळ संभाजीनगर येथील डॉक्टरांना या महिलेची समस्या सांगून पुढील उपचारासाठी तीला संभाजीनगर येथील रुग्णालयात हलवले.

त्याठिकाणी पुढील सातदिवस उपचार घेतल्यानंतर तेथील डॉक्टरांनी या महिलेची प्रकृती ठीक असून आता ७०% पर्यंत नजर आल्याचे सांगितले. व बाकीची नजरहळूहळू थोडी उशीरा येईल असे सांगितले. त्यामुळे गर्भाशयाच्या पिशवीच्या शस्त्रक्रियेनंतर या महिलेची दृष्टी गेली असे म्हणणे चुकीचे आहे. तसेच या प्रकरणी कसल्याही प्रकारचा वैद्यकीय निष्काळजीपणा झाला नसल्याचे ठामपणे सांगितले.

या संदर्भात काहीनी प्रसार माध्यमावर चुकीच्या व एकतर्फी बातम्या प्रसारित केल्या त्या पूर्णपणे निराधार आहेत, कोणतीही बातमी देण्यापूर्वी दोन्ही बाजूंची सखोल चौकशी आणि शहानिशा करणे आवश्यक आहे. घटनेची पूर्ण माहिती न घेता बातम्या देणे योग्य नाही,” असे संत एकनाथ रुग्णालयाचे डॉ. पंडित किल्लारीकर यांनी या “दैनिक वास्तव”च्या प्रतिनिधीशी या बोलतांना सांगितले.

# पैशांची मागणी म्हणजे आत्महत्येस प्रवृत्त करणे नव्हे

## ➤ उच्च न्यायालयाचा ठाम निकाल; एफआयआर व चार्जशीट रद्द

➤ माजलगाव / प्रतिनिधी :
औरंगाबाद हायकोर्ट यांनी आत्महत्येस प्रवृत्त केल्याच्या प्रकरणात महत्त्वपूर्ण निर्णय देत परभणी जिल्ह्यातील आरोपीची निर्दोष सुटका केली आहे. केवळ पैसे परत मागणे यामुळे कोणालाही आत्महत्येस प्रवृत्त केले असे मानता येत नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

या प्रकरणात मुंजाजी ज्ञानोजी रोडगे यांच्याविरुद्ध तडकलस पोलीस ठाणे, जिल्हा परभणी येथे गुन्हा नोंदविण्यात आला होता. तक्रारदार महिलेने दिलेल्या फिर्यादीत नमूद केले होते की, तिच्या पतीकडे आरोपी वारंवार पैशांची मागणी करत होता. या मानसिक तणावातूनच त्यांनी विष प्राशन करून आत्महत्या केल्याचा आरोप करण्यात आला होता.

सदर प्रकरणाची निकाल करताना न्यायमूर्ती व्यास यांनी नमूद केले की, आत्महत्येस प्रवृत्त ठरवण्यासाठी आरोपीकडून स्पष्टपणे उत्तेजन देणे,



धमकी देणे किंवा मदत करणे याचा ठोस पुरावा असणे आवश्यक आहे. केवळ पैसे मागणे हा गुन्हा ठरत नाही. हा वाद आर्थिक स्वरूपाचा असून नागरी प्रकारातील आहे, असेही न्यायालयाने म्हटले.

या सर्व बाबी लक्षात घेऊन न्यायालयाने प्रथम माहिती अहवाल क्रमांक २०६/२०२३, त्यावर आधारित दोषारोपपत्र तसेच न्यायालयीन प्रकरण (आर.सी.सी.क्र.६९/२०२४) रद्द करण्याचे आदेश दिले. या प्रकरणात ॲड. शरद सोळंके यांनी प्रभावी युक्तिवाद केला. तसेच ॲड. महेश काळे यांनी प्रकरणाचे काम पाहिले. त्यांना ॲड. अतुल मुळे व ॲड. अकाश रोडगे यांनी सहकार्य केले.

या निर्णयामुळे आरोपीला मोठा दिलासा मिळाला असून, आत्महत्येस प्रवृत्त प्रकरणांमध्ये स्पष्ट उत्तेजन असणे किती आवश्यक आहे, हे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

# अन..!, चार दिवसापासून बेजार झालेल्या खाडे परिवाराला मिळाले सिलेंडर; ‘दैनिक वास्तव’ चे मानले आभार!

➤ छत्रपती संभाजीनगर : विशेष प्रतिनिधी
संभाजीनगर शहरातील चिकलठाण्या मधील श्री योगेश्वरी भारत गॅस एजन्सी मध्ये खाडे परिवाराने आपले गॅस कनेक्शन काही दिवसापूर्वी ट्रान्सफर केले. ट्रान्सफर करण्यासाठी लागणारी सर्व कागदपत्रे खाडे परिवाराने चिकलठाणा मधील श्री योगेश्वरी भारत गॅस एजन्सीकडे दिली.

ट्रान्सफर झालेले गॅस कनेक्शन काही तासांमध्येच ग्राहकाला दिले जाते. परंतु चार-पाच दिवसापासून भागवत खाडे यांना या गॅस एजन्सीच्या कर्मचाऱ्यांनी आज काम होत नाही तुमचे..! उद्याच्याला या अशा चार-पाच दिवस चकरा मारायला लावण्यात धन्यता मानली. खाडे परिवारावर गॅस



सिलेंडर अभावी उपासमारीची वेळ आली असताना सुद्धा...! त्यांच्या हक्काचे गॅस सिलेंडर दिले गेले नाही. ही परिस्थिती खाडे परिवाराने दैनिक वास्तव चे विशेष प्रतिनिधी भारत बडे यांच्याशी संवाद साधून आपली समस्या मांडली. वास्तवच्या प्रतिनिधीने काही तासातच भागवत खाडे यांना सोबत घेऊन चिकलठाणा मधील श्री योगेश्वरी भारत गॅस एजन्सीला भेट देत... तेथील कर्मचाऱ्यांना यांच्या काही कागदपत्रातील त्रुटी आहे का..? नेमकी अडचण काय आहे तुम्हाला...? यांना सिलेंडर देण्यासाठी..! अशा अनेक प्रश्नांची बरसात करताच एजन्सी चे प्रशासन जागेवर आले..! त्यांच्याकडून झालेली दिरंगाई मान्य करत खाडे परिवाराला ट्रान्सफर कनेक्शनचे गॅस सिलेंडर काही तासातच बजरंग नगर येथे देण्यात आले. गेली चार-पाच दिवसापासून चिकलठाण्या मधील श्री योगेश्वरी गॅस एजन्सी मध्ये चकरा-मारून बेजार झालेल्या खाडे परिवाराला अशा संवेदनशील परिस्थितीमध्ये दिलासा मिळाला. त्याचबरोबर आमच्या प्रतिनिधींनी एजन्सीच्या कर्मचाऱ्यांशी बातचीत केली असता, त्यांनी नागरिकांना गॅस सिलेंडरचे साठे-बाजी करून, कृत्रिम टंचाई न आणण्याचे आवाहन करत सर्वांनी संयम राखत प्रशासनाला सहकार्य करावे असे, आवाहन एजन्सी मधील गजानन जोहरे, धनंजय तुपकर, भुसे मॅडम, प्रियंका मॅडम या कर्मचाऱ्यांनी केले. एजन्सीच्या बाहेर गॅस सिलेंडर साठी नागरिक तोबा गर्दी करत असल्यामुळे, गोंधळाचे वातावरण निर्माण होऊ नये. प्रत्येकाला व्यवस्थितरीत्या गॅस सिलेंडर मिळावं यासाठी एजन्सीच्या बाहेर सुरक्षा रक्षक म्हणून राणी इंगळे या मॅडम आपले कर्तव्य पार पाडत आहेत. तसेच संभाजी नगरच्या जिल्हा पुरवठा प्रशासनाने सर्व जनतेला कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता प्रशासनाला सहकार्य करण्याचे आव्हान केले आहे.

## “दैनिक वास्तव“चे मानले खाडे परिवाराने आभार

श्री योगेश्वरी (चिकलठाणा) भारत गॅस एजन्सीच्या दारामध्ये चकरा मारून बेजार झालेल्या मीराताई खाडे आणि भागवत खाडे यांनी दैनिक वास्तवच्या प्रतिनिधीने अशा संवेदनशील गॅस टंचाईच्या परिस्थितीमध्ये आम्हाला मदत करून, आमच्या हक्काचे गॅस सिलेंडर मिळवून दिले. त्याबद्दल आम्ही “दैनिक वास्तव“ चे आभारी आहोत अशी प्रतिक्रिया दिली.

# महा जम्बो शब्दकोडे

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | | ■ | ५ | ६ | ■ | ७ | ८ | ■ | ९ | |
| १० | | ■ | ११ | | ■ | १२ | | | १३ | | | १४ | | ■ |
| | ■ | १५ | ■ | १६ | १७ | | | ■ | १८ | | ■ | | ■ | १९ |
| २० | २१ | | | ■ | | ■ | २२ | | ■ | २३ | | ■ | २४ | |
| ■ | २५ | | ■ | २६ | ■ | २७ | | ■ | २८ | | ■ | २९ | | |
| ३० | | ■ | ३१ | | ३२ | ■ | ■ | ३३ | | | ३४ | ■ | | ■ |
| ३५ | | | ■ | ३६ | | ३७ | | ■ | | ■ | ३८ | ३९ | ■ | ४० |
| ४१ | | ■ | ४२ | ■ | ४३ | | ■ | ४४ | ■ | ४५ | | | | |
| | ■ | ४६ | | ४७ | ■ | ४८ | ४९ | | | ■ | ■ | | ■ | |
| ५० | ५१ | ■ | ५२ | | ५३ | ■ | ५४ | | ■ | ५५ | ५६ | ■ | ५७ | |
| ५८ | | ■ | | ■ | ५९ | ६० | ■ | ■ | ६१ | ■ | ६२ | | | ■ |
| ■ | ६३ | | ■ | ६४ | | | ६५ | ६६ | ■ | ६७ | | ■ | ६८ | |
| ६९ | | ■ | ७० | ■ | | ■ | ७१ | | ७२ | ■ | ७३ | ७४ | | ■ |
| | ■ | ७५ | | | ■ | ७६ | ■ | ७७ | | ७८ | ■ | | ■ | ७९ |
| ८० | | | | ■ | ८१ | | | | ■ | ८२ | | | | |

### आडवी विधाने

१. देव आनंद, साधना यांचा सुपरहिट चित्रपट
५. मेलेला, ठार
७. मेळ, जुळणी
९. नोकर, सेवक
१०. गळ्यामागील भाग, सत्कार
११. एक हजार किलोचे वजन
१२. राजेश खन्ना, रेखा, राज बब्बर यांचा चित्रपट
१६. शशी कपूर, आशा पारेख यांचा चित्रपट
१८. पोपट, कीर, राघू
२०. सहा धावांचा क्रिकेटमधील फटका
२२. कुबेराचा सेवक
२३. वजनदार
२४. कापरे, थरथर
२५. भारलेला, ताब्यात आलेला
२७. दुर्दशा, वाईट अवस्था
२८. संजय दत्तची प्रभावी भूमिका असलेला चित्रपट
२९. मूषक
३०. किल्ल्याभोवतीची मजबूत भिंत
३१. दानशूर, मोठ्या मनाचा
३३. लाकूड कापण्याचे हत्यार
३५. नूतन, नवा
३६. तलवार
३८. कर, हस्त
४१. अभिप्राय
४३. अंगावरील बारीक मऊ केस
४५. खानेसुमारी, शिरगणती
४६. अज, बकरा
४८. शेंगेचे कवच
५०. धरित्री, पृथ्वी
५२. एका पक्ष्याचे नाव
५४. बाण, शर
५५. नाडी, शीर, धमनी
५७. अजगर
५८. पर्वत; जिन्नस
५९. इटलीची राजधानी
६१. सौभाग्यवतीचे संक्षिप्त रूप
६२. मंडप
६३. वडीलभाऊ; विनोद मेहराचा चित्रपट
६४. कोषाध्यक्ष
६७. दु:ख, वेदना
६८. झाड, वृक्ष
६९. बकऱ्याचे कमावलेले कातडे
७१. युद्ध, रण
७३. दोरी, दोर
७५. सफेद, पांढरा
७७. जमिनीवर अंथरण्याचे जाडजूड बिछाईत
८०. लोणी
८१. अवहेलना, मानखंडना
८२. धर्मेंद्र-जीतेंद्र जोडीचा हिट चित्रपट

### उभी विधाने

१. उत्तर कुमार, शर्मिला टागोर यांचा चित्रपट
२. वर्ष, साल
३. नाटक-सिनेमात काम करणारा पुरुष
४. सोने, सुवर्ण
५. हरिणाच्या डोळ्यांसारखे डोळे असलेली सुंदर स्त्री
६. होडी, मचवा, नाव
७. मोर्चेबांधणी, एकत्र करणे
८. प्रतिबंध, बंदी (हिंदी)
९. ‘शुक्रतारा’ हा कार्यक्रम सादर करणारे गायक - अरुण **
१२. अभिनय, नट्टाफट्टा
१३. पक्ष्याच्या डोक्यावरील शेंडी
१४. यज्ञ, यजन
१५. गगन, नभ
१७. योग्य निर्णय, निवाडा
१९. मडक्याचा तुकडा
२१. ताजा, प्रफुल्लित
२४. फाणस, लालटेन
२६. नाराज, निराश
२८. कळलाव्या; ब्रह्मदेवाचा मानसपुत्र
३०. शरीर - अंत:करण-पैसा इत्यादी सर्वस्व
३२. फाशांवरून शकुन पाहण्याची विद्या
३४. तृष्णा
३७. अंत, अखेर, समाप्ती
३९. धट्टाकट्टा, मजबूत, बळकट
४०. श्वापद, पशू
४२. तोटा, हानी
४४. राजेश खन्ना, शर्मिला टागोर, फिरोज खान यांचा चित्रपट
४७. भीती, भय
४९. एक हिंदी अभिनेत्री - ** अग्निहोत्री
५१. गायन म्हणण्याची विशिष्ट धाटणी, शैली
५३. भारताच्या पहिल्या महिला राज्यपाल - **** नायडू
५६. परस्परांपासून सारख्या अंतरावर असलेला
५७. आमंत्रण, बोलावणे
६०. अंत:करण
६५. नोकर, सेवक
६६. अरबी वर्षाचा नववा महिना
६९. नेत्र, डोळे
७०. आर्थिक सामर्थ्य
७२. धुळीचा कण, रेणू
७४. मुस्लिमांचा नमस्कार
७५. पती, मालक, कारभारी
७६. कढवलेले लोणी
७८. मकरंद
७९. पराक्रमी, लढवय्या

## महा जम्बो शब्दकोडे कालचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| व | सं | त | का | ने | ट | क | र | ■ | धु | ■ | टो | क | दा | र |
| सा | ग | र | ■ | म | ■ | स | ई | प | रां | ज | पे | ■ | दा | स |
| ■ | न | ■ | द | ■ | वा | र | स | ■ | डे | रा | ■ | लू | ■ | वं |
| अ | म | री | श | पु | री | ■ | ■ | म | ■ | सं | क | ट | ■ | ती |
| ना | त | ■ | र | त | ■ | चौ | क | शी | ■ | ध | ■ | मा | घ | ■ |
| थ | ■ | र | थ | ■ | मा | का | ■ | द | र | ■ | खा | र | ■ | क |
| ■ | मो | द | ■ | क | ल | र | व | ■ | वा | ट | प | ■ | त | म |
| मे | ह | न | त | ■ | व | ■ | जी | व | न | ■ | र | ख | वा | ला |
| ह | र | ■ | ■ | क | ण | ख | र | ■ | गी | त | ■ | रू | ■ | ■ |
| बू | ■ | स | व | ड | ■ | प | ■ | उ | ■ | ग | र | ज | वं | त |
| ब | र | खा | स्त | ■ | रा | ■ | उ | दा | ह | र | ण | ■ | श | र |
| ■ | त्न | ■ | रा | ज | धा | नी | ■ | स | ल | ■ | जी | व | ■ | बे |
| न | मा | ज | ■ | न्म | ■ | ल | ग्न | ■ | का | ■ | त | र | बे | ज |
| क | ला | का | र | ■ | ना | म | ■ | भी | ■ | अ | ■ | पा | ■ | ■ |
| ली | ■ | त | ग | म | ग | ■ | स | म | ज | दा | र | ■ | शो | ध |

# रामनवमीच्या पावन पर्वावर भारतीय स्टेट बँक वडवणीचा सेवाधर्म उजळला

## फळे-पाणी वाटपातून मानवतेचा जिव्हाळा

➤ **वडवणी : प्रतिनिधी**
भारतीय स्टेट बँक वडवणी शाखेच्या वतीने आज रामनवमी निमित्त सामाजिक बांधिलकी जपत एक प्रेरणादायी उपक्रम राबविण्यात आला. राम मंदिर चौक, वडवणी येथे नागरिकांना फळे व थंड पाण्याचे वाटप करून बँकेने सेवाभावाचा आदर्श घालून दिला.

उन्हाळ्याची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असताना, रस्त्यावरून प्रवास करणाऱ्या नागरिकांना दिलासा देण्यासाठी हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. सकाळपासूनच या ठिकाणी नागरिकांची वर्दळ वाढू लागली होती. प्रवासी, कामगार, ज्येष्ठ नागरिक, महिला व विद्यार्थी यांनी या उपक्रमाचा मोठ्या प्रमाणावर लाभ घेतला. विशेषत: कडक उन्हात तहानलेल्या व थकलेल्या नागरिकांसाठी हा उपक्रम दिलासादायक ठरला.

या प्रसंगी शाखा व्यवस्थापक चंद्रकांत कांबळे यांच्या नेतृत्वाखाली बँकेच्या सर्व कर्मचाऱ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. कर्मचाऱ्यांनी स्वत: पुढाकार घेत नागरिकांना फळे व पाण्याचे वितरण केले. प्रत्येक नागरिकाशी आपुलकीने संवाद साधत सेवा देण्याचा प्रयत्न करण्यात आला, त्यामुळे उपक्रमाला मानवी स्पर्श लाभला.

रामनवमी हा भगवान श्रीराम यांच्या जन्मोत्सवाचा पवित्र दिवस असून, या दिवशी दानधर्म, सेवा व समाजहिताचे कार्य करण्याला विशेष महत्त्व दिले जाते. त्याच परंपरेला अनुसरून





बँकेने हा उपक्रम राबवून धार्मिक सणाला सामाजिक उत्तरदायित्वाची जोड दिली आहे.

या उपक्रमाद्वारे 'बँकिंग सेवांबरोबरच समाजसेवा' हा संदेश देण्यात आला. केवळ आर्थिक व्यवहारापुरते मर्यादित न राहता, समाजातील गरजूंना मदतीचा हात देणे हीदेखील संस्थेची जबाबदारी असल्याचे या कृतीतून अधोरेखित झाले.

स्थानिक नागरिकांनी या उपक्रमाचे मनापासून स्वागत केले. "अशा प्रकारच्या उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक वातावरण निर्माण होते," अशी भावना अनेकांनी व्यक्त केली. काहींनी या उपक्रमाचे कौतुक करत इतर संस्थांनीही यापासून प्रेरणा घेण्याची गरज व्यक्त केली.

एकूणच, रामनवमीच्या पावन दिवशी वडवणी येथील भारतीय स्टेट बँक शाखेने राबविलेला हा उपक्रम केवळ फळे व पाण्याचे वाटप नसून, मानवतेचा जिव्हाळा आणि सामाजिक बांधिलकी यांचे जिवंत उदाहरण ठरला आहे.

## विशेष



## चिंचगव्हाणच्या सुशील चंदनशिवची भारतीय रेल्वेत लोको पायलटपदी निवड

➤ **माजलगांव / प्रतिनिधी :**
माजलगाव तालुक्यातील चिंचगव्हाण येथील सुभाष चंदनशिव यांचा सुपुत्र सुशील चंदनशिव याची भारतीय रेल्वेत लोको पायलटपदी निवड झाली आहे.

अत्यंत साध्या परिस्थितीतून शिक्षण घेत, कठोर परिश्रम आणि चिकाटीच्या बळावर सुशीलने हे यश संपादन केले आहे. त्याच्या या यशामुळे परिसरातील तरुणांसाठी तो प्रेरणास्थान ठरला असून, कठीण परिस्थितीतही जिद्द आणि मेहनतीच्या जोरावर यश मिळवता येते, हे त्याने दाखवून दिले आहे. सुशीलच्या या यशाबद्दल पंचक्रोशीतून त्याच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत असून, विविध स्तरांतून त्याचे अभिनंदन करण्यात येत आहे. चंदनशिव कुटुंबात आनंदाचे वातावरण असून, गावातही जल्लोषाचे वातावरण निर्माण झाले आहे.



## समता कॉलनी येथे राम नवमी निमित्त रामरक्षा पठण कार्यक्रम संपन्न

➤ **माजलगाव : प्रतिनिधी**
राम नवमीच्या पावन निमित्ताने समता कॉलनी येथे धार्मिक वातावरणात रामरक्षा पठण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. दिनांक २५ मार्च रोजी सायंकाळी ६ वाजता सौ. संध्या भगवान देशमुख यांच्या निवासस्थानी हा कार्यक्रम संपन्न झाला.

या प्रसंगी समता कॉलनीतील सौ. रेणुका लक्ष्मीकांत देशमुख, सौ रंजना गजानन देशपांडे, सौ संध्या भगवान देशमुख सौ अदिती दीपक देशमुख सौ कल्याणी निखिल देशमुख सौ राजश्री प्रशांत कुलकर्णी सौ रुची अनंत कुलकर्णी सौ मिना प्रल्हाद सोळंके सौ पूजा मनोज शर्मा मुळे वहिनी राजश्री देशमुख मीना चव्हाण सौ मीरा शेषराव इंगळे, सौ मोनिका खराडे या महिला मंडळाच्या सदस्यांनी मोठ्या उत्साहाने व श्रद्धाभावाने सहभाग घेतला. सामूहिक रामरक्षा पठणामुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. उपस्थित महिलांनी एकसुरात रामरक्षा म्हणत भगवान श्रीरामांच्या चरणी भक्ती अर्पण केली.

कार्यक्रमाच्या शेवटी सर्व उपस्थितांनी एकमेकांना राम नवमीच्या शुभेच्छा देत प्रसादाचा लाभ घेतला. या उपक्रमामुळे समाजात एकोपा आणि धार्मिक जागृती वाढीस लागल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

## महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करत भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन

➤ **माजलगाव : प्रतिनिधी**
महात्मा ज्योतिराव फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त सामाजिक बांधिलकी जपत क्रांतीसूर्य बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, माजलगाव यांच्या वतीने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.



सदर रक्तदान शिबिर सोमवार, दि. १३ एप्रिल २०२६ रोजी आयोजित करण्यात येणार असून, या उपक्रमामागील उद्देश समाजात रक्तदानाबाबत जनजागृती करणे, रक्ताची गरज भागवणे तसेच गरजू रुग्णांना वेळेवर मदत उपलब्ध करून देणे हा आहे.

"रक्तदान हेच जीवनदान" या संदेशाला कृतीत उतरवण्यासाठी संस्थेने हा उपक्रम हाती घेतला आहे. आजच्या काळात अपघात, शस्त्रक्रिया, प्रसूती व विविध आजारांमध्ये रक्ताची अत्यंत गरज भासते. अशा वेळी प्रत्येक नागरिकाने रक्तदानासारख्या पवित्र कार्यात सहभागी होणे ही काळाची गरज आहे.

या शिबिरात अनुभवी वैद्यकीय पथकाच्या देखरेखीखाली सुरक्षित पद्धतीने रक्तदान प्रक्रिया पार पाडली जाणार आहे. रक्तदात्यांची आवश्यक तपासणी करूनच रक्तदान घेतले जाईल व त्यानंतर अल्पोपहाराची व्यवस्था देखील करण्यात येणार आहे.

संस्थेच्या वतीने सर्व युवक, नागरिक, सामाजिक कार्यकर्ते व विविध संघटनांच्या पदाधिकाऱ्यांना मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन करण्यात येत आहे. प्रत्येकाने स्वत: रक्तदान करावे तसेच आपल्या ओळखीतील किमान दोन व्यक्तींना रक्तदानासाठी प्रेरित करावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. रक्तदानासाठी इच्छुकांनी नाव नोंदणी करण्यासाठी खालील संपर्क क्रमांकांवर संपर्क साधावा किंवा उपलब्ध Google Form द्वारे आपले रजिस्ट्रेशन पूर्ण करावे.
संपर्क क्रमांक : ९८९०५३२७७८ / ९७३०१६१८१६ / ९६७३३३२४२१ / / ८००७१९००१०

## शकुंतलाबाई देशमुख यांचे निधन

➤ **माजलगाव : प्रतिनिधी**
शहरातील भट गल्ली भागातील रहिवाशी असलेल्या शकुंतलाबाई प्रभाकरराव देशमुख/मोगरेकर वय ९० वर्षे यांचे वृध्दापकाळाने निधन झाले.



त्यांच्या पार्थीव देहावर सिंदफणा नदीतिरावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. येथील फ्रेममेकर सुधीर देशमुख, न्यायालयीन कर्मचारी संदीप देशमुख यांच्या त्या आई होत.

## तालखेड वीजप्रश्नावर तोडगा; लेखी आश्वासनानंतर उपोषण मागे

➤ **माजलगाव : प्रतिनिधी**
बीड जिल्ह्यातील माजलगाव तालुक्यातील मौजे तालखेड येथे गेल्या एक ते दोन महिन्यांपासून सुरू असलेल्या वीजपुरवठा समस्येमुळे संतप्त झालेल्या ग्रामस्थांनी छेडलेले आमरण उपोषण अखेर मागे घेतले आहे. महावितरणकडून लेखी आश्वासन मिळाल्यानंतर ग्रामस्थांनी आंदोलन स्थगित करण्याचा निर्णय घेतला.



तालखेड येथे वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे ग्रामस्थ त्रस्त झाले होते. वीजबिल वसुलीत आघाडीवर असूनही तसेच वीज चोरीचे प्रमाण शून्य असतानाही अपुरा वीजपुरवठा मिळत असल्याची तक्रार ग्रामस्थांनी केली होती. यावर तोडगा न निघाल्याने २५ मार्च २०२६ पासून आमरण उपोषण सुरू करण्यात आले होते.

या उपोषणात कैलास मोरे, गुलाबराव मोरे, पंडित ओव्हाळ, रेवन यादव, दिनकर रिंगणे, राजाभाऊ परदेशी, नितेश खोटे, फरिद पठाण, वैभव मोरे, अनिल गायकवाड, सोपानराव वीर, आबासाहेब मोरे, रमेश शेंडगे, दयानंद जाधव आदी ग्रामस्थ सहभागी झाले होते.

ग्रामपंचायत तालखेडच्या वतीने सरपंच सौ. गितांजली गुलाब मोरे, उपसरपंच श्री. पंडित बन्सी ओव्हाळ, ग्रामविकास अधिकारी श्री. सुग्रीव भारत भारती व सदस्यांनी उपविभागीय अभियंत्यांना निवेदन देत तातडीने वीजपुरवठा सुरळीत करण्याची मागणी केली होती.

उपोषणादरम्यान महावितरण विभाग व ग्रामस्थ यांच्यात बैठक घेण्यात आली. यामध्ये माजलगाव उपविभागातील ३३ केव्ही मालीपारगाव वाहिनीवर अतिरिक्त भार पडत असल्यामुळे वारंवार वीज खंडित होत असल्याचे स्पष्ट करण्यात आले. समस्येच्या कायमस्वरूपी तोडग्यासाठी MSKVY 2.0 योजनेअंतर्गत नवीन 33 केव्ही लिंक लाईन मंजूर करण्यात आली असून दोन उपकेंद्रांचे विभाजन करण्यात येणार आहे. आवश्यक साहित्य १० ते १२ दिवसांत उपलब्ध करून अंदाजे १५ दिवसांत काम पूर्ण केले जाईल, असे लेखी आश्वासन महावितरणकडून देण्यात आले.

दरम्यान, विजय दादा साळवे यांनी दोन्ही बाजूंमध्ये समन्वय साधत महत्त्वाची मध्यस्थी केली. त्यांच्या प्रयत्नांमुळे ग्रामस्थांनी आंदोलन मागे घेत प्रशासनाला सहकार्य करण्याचा निर्णय घेतला.

तथापि, दिलेल्या मुदतीत काम पूर्ण न झाल्यास पुन्हा आंदोलन छेडण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला असून आता महावितरणच्या कार्यवाहीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## मोठेवाडीत महादेव व पार्वतीचा विवाह सोहळा थाटात; शेकडो वर्षांची परंपरा या वर्षी पण!



➤ **माजलगाव : प्रतिनिधी**
तालुक्यातील मोठेवाडी येथील लहाना महादेव म्हणून प्रसिद्ध असलेल्या मंदीरात महादेव आणि पार्वती या देवांच्या लग्न सोहळ्याची रेलचेल पाहायला मिळाली. सकाळपासूनच वर व वधू कडील पाहुणे मंडळी लहाना महादेव मंदीरात सकाळपासूनच हजेरी लावत होती. वाजंत्री, मंगलाष्टके सारे काही एखाद्या खऱ्याखुऱ्या लग्नासारखे चित्र या ठिकाणी पाहायला मिळाले.

हा लग्नसोहळा साजरा करण्याची परंपरा या गावात शेकडो वर्षापासून स्थानिक हिवरकर या कुटुंबियांनी जोपासली आहे. या लग्न सोहळ्याचा मान हिवरकर परिवाराकडे आहे. अनादी काळापासून हा लग्नसोहळा मोठ्या उत्साहात पार पडतो. यंदाही या लग्न सोहळ्यात मोठेवाडी परिसरातील भाविक उपस्थित होते. यां लग्न सोहळ्यात पुरोहित सुनील( नाना ) जोशी, तरुण तरुणी आणि महिलां मोठ्या प्रमाणात सहभागी झाल्या होत्या. हा लग्नसोहळा मोठेवाडी येथील जागृत देवस्थान लहाना महादेव मंदिरात दरवर्षी चैत्र महिन्यातील अष्टमीला साजरा करण्यात येतो अशी माहिती या लग्न सोहळ्याचे आयोजक महादेवराव हिवरकर यांनी दिली.

या विवाह सोहळ्या प्रसंगी अमृत हिवरकर यांनी महाप्रसादाचे आयोजन केले होते. हा लग्न सोहळा यशस्वी करण्यासाठी सुदर्शन हिवरकर, अशोक रासवे, सुनील हिवरकर, चक्रधर हिवरकर, सोमेश्वर हिवरकर, भारत खेत्री, रामभाऊ गरड, विष्णु लेंडाळ, यांच्या सह गावातील नागरिकांनी विशेष परिश्रम घेतले.

## किट्टी आडगाव ते पुरूषोत्तमपुरी रस्त्याला मंजुरी

### ➤ डॉ ओमप्रकाश शेटे यांच्या पाठपुरायाव्याला यश ग्रामस्थांकडून सत्कार

➤ **माजलगाव : प्रतिनिधी**
तालुक्यातील किट्टी आडगाव ते पुरूषोत्तमपुरी या १४ कोटी ९७ लक्ष रूपयांच्या रस्ता कामास आयुष्यमान भारत योजनेचे महाराष्ट्र राज्य प्रमुख डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी शासनदरबारी पाठपुरावा करून मंजुर आणल्याबद्दल पुरूषोत्तमपुरी ग्रामस्थांच्या वतीने डॉ. शेटे यांचा दिंद्रुड येथे त्यांच्या निवासस्थांनी जात यथोचित सत्कार करण्यात आला.



आगामी दोन ते तीन महिण्यांच्या कालावधीत येणा-या भगवान पुरूषोत्तमाच्या यात्रोत्सवाच्या दृष्टीने महत्वपुर्ण असलेला हा रस्ता मंजुरीसाठी प्रलंबीत होता.

याबाबत डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी शासनस्तरावर पाठपुरावा करत किट्टी आडगाव ते पुरूषोत्तमपुरी या १४ कोटी ९७ लक्ष रूपयांच्या रस्ता कामास मंजुरी आणली.

याबद्दल पुरूषोत्तमपुरी ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी बाजार समितीचे उपसभापती श्रीहरी नाना मोरे, शिवाजीराव गोळेकर, शरद सोळंके, पोलिस पाटील बालासाहेब लोखंडे, प्रमोद गोळेकर, लक्ष्मण पितळे, प्रकाश थोरात, सुनिल थोरात, प्रभाकर गायकवाड, अक्षय लोखंडे, राजेभाउ मोरे यांचेसह ग्रामस्थांची उपस्थिती होती.

## धक्कादायक! टी20 वर्ल्ड कप तिकीट काळाबाजारप्रकरणी माजी क्रिकेटपटूसह ६ जणांना अटक

मुंबई : तिकिटांच्या काळाबाजार प्रकरणात मुंबई पोलिसांना मोठे यश मिळाले आहे. यावर्षी भारत आणि श्रीलंका येथे टी20 वर्ल्ड कपचे आयोजन करण्यात आले होते, ज्यामध्ये भारताने विजेतेपद पटकावले. या स्पर्धेतील दुसऱ्या उपांत्य सामन्यात भारत आणि इंग्लंड असा सामना रंगला होता. ५ मार्च रोजी मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर झालेल्या या सामन्याच्या तिकिटांचा काळाबाजार करणाऱ्या रॅकेटचा पर्दाफाश करत पोलिसांनी एका प्रशिक्षकासह एका माजी क्रिकेटपटूला अटक केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पोलिसांनी २६ वर्षीय बलवंत सिंह सोधा याला अटक केली असून तो यापूर्वी मुंबई अंडर-१९ संघाकडून खेळला होता. पोलिसांच्या माहितीनुसार, या नेटवर्कमध्ये बलवंत सिंहची महत्त्वाची भूमिका होती आणि तिकिटांची व्यवस्था तोच करत होता. त्यानंतर तो आपल्या साथीदारांना ही तिकिटे जास्त दराने विकण्यासाठी पुरवत होता.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती अशोक नगर कार्यकारिणी जाहीर

### - अध्यक्षपदी आनंद शिंदे, उपाध्यक्षपदी अनिल भराटे तर कोषाध्यक्षपदी रोहित भैय्या साळवे यांची निवड

**माजलगाव / प्रतिनिधी :**
भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती निमित्त सम्राट अशोक नगर माजलगाव येथील बुद्ध विहारांमध्ये बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीमध्ये उत्सव समितीची कार्यकारणी जाहीर करण्यात आली.





यावेळी ही कार्यकारिणी विजय दादा साळवे, अविनाश जावळे, राकेश दादा साळवे, ॲड. नंदकिशोर खळगे, सिद्धार्थ ससाने यांच्या मार्गदर्शनाखाली जाहीर करण्यात आली असून या बैठकीस अशोक नगर येथील सामाजिक कार्यकर्ते तरुण मंडळी व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवली होती.

जयंती उत्सव समिती अध्यक्षपदी आनंद शिंदे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली असून उपाध्यक्षपदी अनिल भराटे कोषाध्यक्ष पदी रोहित भैय्या साळवे सचिव पदी सार्थक शिंदे प्रसिद्धी प्रमुख पदी पत्रकार पृथ्वीराज निर्मळ, संघटक नितीन प्रधान, सजावट प्रमुख नितीन जावळे सल्लागारपदी भारत तांगडे, बाबासाहेब सूर्यवंशी, मुंजाभाऊ वैराळे, श्रीहरी नाना भोजने, कांबळे सर, अशोक कांबळे, धोंडीराम ढालमारे, अमोल शेरकर, शत्रुघन कसबे, सिद्धार्थ खिल्लारे यांची नियुक्ती करण्यात आली असून हा जयंती उत्सव ● पान ३ वर...

## ॲड.सुधाकरराव देशमुख नैतिकतेचे अधिष्ठान असणारे राजकारणी मंगलाताई सोळंके

### ➤ ॲड.सुधाकरराव देशमुख स्मृती पुरस्कार प्रदान सोहळा संपन्न

➤ **माजलगाव / अरविंद ओव्हाळ**
जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर ध्येयवादाला तत्वनिष्ठतेची जोड देवून सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रांसह राजकारणात ॲड. सुधाकरराव देशमुख यांनी नैतिकतेचे अधिष्ठान ठेवून केलेले कार्य राजकारणातील नव्या पिढीला मार्गदर्शक आहे असे प्रतिपादन माजलगाव विकास प्रतिष्ठानच्या अध्यक्षा सौ. मंगलाताई सोळंके यांनी केले.



कै. ॲड. सुधाकरराव देशमुख स्मृती प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित "स्मृतिगंध" या कार्यक्रमात सामाजिक कार्यकर्त्या तथा महिला चळवळींच्या आधारवड सौ. मंगलाताई प्रकाशदादा सोळंके यांना ॲड. सुधाकरराव देशमुख स्मृती पुरस्काराने गौरविण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी शिक्षक आमदार डी. के. देशमुख यांची तर व्यासपीठावर संयोजिका ॲड. सुलभाताई देशमुख, नगरसेवक डॉ. सचिन देशमुख, डॉ. रोहिणी देशमुख, ॲड. एस. आर. शर्मा यांची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना मंगलाताई सोळंके यांनी ॲड. सुधाकरराव देशमुख यांच्या दिशादर्शक कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख करत स्मृती प्रतिष्ठान सामाजिक जाणिवेच्या भावनेने कार्यरत असल्याचे सांगितले. तसेच ग्रामीण भागातील महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी सामाजिक संस्था व कार्यकर्त्यांनी शाश्वत कार्य करण्याची गरज असल्याचे मत यावेळी व्यक्त केले.

याप्रसंगी अध्यक्षीय समारोपात माजी आ. डी. के. देशमुख म्हणाले, सत्ताधाऱ्यांवर अंकुश ठेवून जनसामान्यांच्या प्रश्नांची सोडवणूक एकटा विरोधक करू शकतो हे ॲड. सुधाकरराव देशमुख यांनी राजकारणात दाखवून दिले तसेच रोखठोक भूमिकेमुळे सर्वच क्षेत्रात त्यांचा आदरयुक्त दरारा होता असेही मत व्यक्त केले.

यावेळी माजी आ. डी. के. देशमुख यांनी मंगलाताई सोळंके यांच्या शैक्षणिक व महिला सबलीकरणाच्या क्षेत्रातील पारदर्शक कार्याची प्रशंसा करत त्यांचे अभिनंदनही केले. याप्रसंगी नगरसेवक डॉ. सचिन देशमुख यांनी ॲड. सुधाकरराव देशमुख यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू आणि या कार्यक्रमा मागील भूमिका आपल्या प्रास्ताविकातून विशद केली.

याप्रसंगी मानपत्राचे वाचन दिग्दर्शक पद्मनाभ पाठक यांनी केले. मान्यवरांचा परिचय डॉ. रोहिणी देशमुख यांनी तर सूत्रसंचालन हिमांशू देशमुख आणि आभार ॲड. सुधांशु पाठक यांनी मानले. योगिता मोडक व धनंजय जाडे यांनी प्रार्थना व गीत सादर केले. यावेळी कार्यक्रमास शहरातील डॉक्टर, वकील, शिक्षक, व्यापारी यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांची मोठ्या संख्येने कार्यक्रमास उपस्थिती होती.